महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
भविष्य निर्वाह निधी विभाग

फोन नं. : ०२२ - २४०९०५४६
०२२ - २४०९०७७०
०२२ - २४०९२५३१
फॅक्स नं. ०२२ - २४०९३११०

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
भविष्य निर्वाह निधी विभाग,
धारावी रोड, माटुंगा (पू) मुंबई ४०० ०१९.

email cpfmseb.2009@reddiffmail .com
website : www.mahadiscom.in

क्र लेवि/भनिनि/गुंतवणूक/परतावा/ना परतावा/D/8400 दिनांक : 14 SEP 2012

## विभागीय परिपत्रक क्र.१८६

विषय : भविष्य निर्वाह निधी मंजुर तथा वितरीत अग्रीम रक्कमेची नोंद सभासदाचे सेवापुस्तिकेमध्ये घेणेबाबत.

भविष्य निर्वाह निधी विभागामध्ये क्षेत्रिय तथा विभागीय कार्यालयामार्फत आलेल्या सभासदांचे परतावा / ना परतावा अग्रीम मागणी अर्जावर कार्यवाही करून सभासदांचे अग्रीम मागणी अर्ज मंजुर केले जातात. तदनंतर सदरच्या मंजुरी आदेशाची मूळ प्रत व खातेदाराची प्रत विभागीय तथा क्षेत्रिय कार्यालयाकडे मंजुर रक्कम सभासदास अदा करण्यासाठी पाठविली जाते. क्षेत्रिय तथा विभागीय कार्यालय अर्थोपाय विभागाकडून रक्कम प्राप्त झाल्यानंतर संबंधित सभासदांस मंजुर रक्कम अदा करते. सभासदास मंजुर भविष्य निर्वाह निधी अग्रीम रक्कम अदा झाल्यानंतर सभासदाचे सेवापुस्तिकेमध्ये सदरची नोंद घेणे आवश्यक आहे. परंतू या कार्यालयाचे असे निदर्शनात आले आहे की बरीचशी क्षेत्रिय तथा विभागीय कार्यालये अशा प्रकारची नोंद सभासदाचे सेवापुस्तिकेमध्ये घेत नाहीत. सभासद निवृत्त झाल्यावर सभासदाचे भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदानाचे अर्जावर कार्यवाही करताना संबंधित विभागाकडून अग्रीम मंजुर परंतू वितरीत न झालेल्या अहवालाची ( L S N D Reoport) पडताळणी केली जाते. अशा अहवालामध्ये जर सभासदाचे नावे एखादी अग्रीम मंजुर परंतू वितरीत न झालेली रक्कम दिसून आली तर अशा प्रकारच्या मंजुर अग्रीमाबाबतची माहिती विभागीय कार्यालयाकडून मागवली जाते. सदरची माहिती विभागीय कार्यालयाकडून प्राप्त झाल्यानंतरच सभासदाचे अंतिम प्रदान मागणी अर्जावर कार्यवाही केली जाते. अन्यथा सदरचा अंतिम प्रदानाबाबतचा मागणी अर्ज प्रलंबित ठेवला जातो. त्यामुळे सभासदास नाहक मनस्ताप होतो. अशा प्रकारच्या बऱ्याचशा प्रकरणांमध्ये विभागीय कार्यालयाकडून रेकॉर्ड उपलब्ध नाही, (कॅशबुक, कॅशव्हावचर, डॉकेट व्हावचर इ.) सभासदास अग्रीम मंजुर झाला तेव्हा या कार्यालयात कार्यरत नव्हता, रेकॉर्ड नाश पावले अशा प्रकारे कळविले जाते. त्यामुळे सभासदाचे अंतिम प्रदान अर्जावर कार्यवाही करण्यांस विलंब होतो. जर सभासदाचे सेवापुस्तिकेमध्ये भविष्य निर्वाह निधी परतावा / ना परतावा अग्रीम रक्कम अदा केल्याची नोंद घेतलेली असेल तर इतर रेकॉर्डवर विसंबून न राहता सेवापुस्तिकेवरील नोंदीनुसार विभागीय कार्यालय संबंधित माहिती या कार्यालयास कळवू शकते.

करीता या परिपत्रकानुसार सर्व क्षेत्रिय तथा विभागीय कार्यालयांस निर्देश देण्यात येत आहे की सभासदांचे सेवापुस्तिकेमध्ये परतावा/ ना परतावा भविष्य निर्वाह निधी अग्रीम अदा झाल्याबाबतची नोंद घेतल्यानंतर अग्रीम रक्कम सभासदास अदा करण्यात यावी. सदरच्या नोंदीनुसार अग्रीम मंजुरी आदेश क्रमांक, दिनांक तथा मंजुर तथा अदा रक्कमेबाबतची नोंद ठेवण्यांत यावी. या परिपत्रकातील आदेशांची त्वरीत अंमलबजावणी करण्यांत यावी.

महाव्यवस्थापक (वित्त)/भनिनि

प्रेषण यादीप्रमाणे.

MAR/P.97/11.9